**7.1.9Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

College have made efforts to equip the students with the knowledge, skill, values and giving holistic all round education. The students are inspired by participating in various programs regarding traditions, values, duties, and responsibilities. The college has the following initiates for the promotion of values, rights duties and responsibilities of citizens as follows:

| Sr. No. | Name of initiatives | Date |
|---|---|---|
| 1. | NSS establishment day | 25/09/2021 |
| 2. | Right to information day | 28/09/2021 |
| 3. | COVID-19 vaccination camp | 25/10/2021 to 02 /11/ 2021 |
| 4. | Voter awareness camping | 25/12/2021 to 25/01/2022 |
| 5. | Distribution of New voter registration form | 02/05/2021 |
| 6. | Essay competition | 10/01/2022 |
| 7. | Celebration of voter's day | 25/01/2022 |
| 8. | Constitution day | 26/01/2022 |
| 9. | Celebration of AIDS awareness day | 21/12/2021 |
| 10 | National consumer day | 24/12/2021 |
| 11 | Programme on "Digital Literacy" | 04/01/2022 |
| 12 | Conference on "IPR" | 03/02/2022 |
| 13 | Programme on " National Unity and Integrity" | 02/03/2022 |

## 1. Celebration of NSS Establishment Day

To gain skill of leadership and promote the youth for national integration. Also encouraging youth to participate enthusiastically in the process of national development and promote national integration through corporate living and cooperative action, NSS was established. The NSS establishment day was celebrated by our NSS unit on zoom platform.



जळगाव तरुण भारत

Main Edition | 2021-09-26 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

### ऐनपूर महाविद्यालयात रासेयो स्थापना दिन साजरा

**रावेर :** तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला. कवयित्री बहिणाबाई ग्राम वाचन कट्ट्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे होते. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून रासेयोचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. आशुतोष वर्डीकर उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. जयंत नेहेते यांनी केले. तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. दिपक पाटील यांनी करून दिला. प्रा. डॉ. आशुतोष वर्डीकर यांनी मार्गदर्शनपर व्याख्यानात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्ट व इतिहास समजावून सांगितला. त्यांनी विद्यार्थ्यांना रासेयोच्या बोधचिन्हांबद्दल सविस्तर माहिती सांगितली. राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांना स्वत:चे व्यक्तिमत्व चांगल्या पद्धतीने घडविता येते. तसेच विद्यार्थ्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व घडवून तरुणांमध्ये सामाजिक बांधीलकीची जाण निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करीत असते असेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी अध्यक्षीय भाषणात स्वयंसेवकांना ५२ व्या रासेयो स्थापना दिवसाच्या शुभेछा देऊन मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रेरणा पुरुष म्हणून आपण स्वामी विवेकानंदांकडे बघत असतो. विद्यार्थ्यांचा कान धरून त्यांना संस्कार देता येत नाहीत. पण राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांवर आपोआप संस्कार होत असतात. कारण राष्ट्रीय सेवा योजना ही एक संस्कारांची शाळा आहे असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवा भाव व देशाप्रती भक्ती निर्माण होत असते. कोणालाही मदत करतांना मनामध्ये कोरडी सहानुभूती कामाची नाही तर त्या सहानुभूतीमध्ये प्रेमाचा, मनाचा ओलावा असला पाहिजे आणि हा ओलावा राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपल्याला मिळत असतो असे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जयंत नेहेते तर आभार महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रेखा पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सतीश वैष्णव, डॉ. संदीप साळुंके, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला एकूण १६८ स्वयंसेवक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी नोंदणी केली.

The programme was presided by Principal Dr. J. B. Anjane, the chief guest and invited talk by Dr Ashutosh Vardikar, Divisional coordinator of NSS under KBC North Maharashtra University. Dr. Vardikar nicely explained the motto of NSS with objectives. Every student having social commitment was explained by presided speech. The program was anchored by NSS development officer of college Dr J. P. Nehete, vote of thanks by Dr. Rekha Patil. Nearly 168 NSSvolunteer are participated.

## 2. Right to information Day:

The freedom of every individual in the society should be intact, and the individual should be able to live with dignity, right to information day was celebrated in college by IQAC on 28/09/2021. The program was guided by assistant group development officer, Panchayat samiti Raver, with presided by Principal Dr. J. B. Anjane. The progamme was anchored by Dr S. S. Salunke, Guest was introduced by IQAC coordinator Dr. S. N. Vaishanv and vote of thanks by Dr. J. P. Nehete. 120 participants are attained this prgramme






जळगाव तरुण भारत

Main Edition | 2021-10-06 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com

## ऐनपूर महाविद्यालयात माहितीचा अधिकार विषयावर व्याख्यान

**रावेर :** तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय माहित अधिकारी दिन या निमित्ताने महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी समितीतर्फे माहितीचा अधिकार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते.

अध्यक्षक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी भूषविले. प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून सहाय्यक गटविकास अधिकारी, उरण, के. बी. अंजने हे होते. परिचय डॉ. एस. एन. वैष्णव यांनी करून दिला. के. बी. अंजने यांनी मार्गदर्शनपर व्याख्यानात सामान्य नागरिकाला माहितीचा अधिकार प्राप्त होण्यासाठी राज्य आणि केंद्रीय पातळीवर झालेल्या चळवळीबद्द्ल माहीती दिली. माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत आपण कोणकोणत्या प्रकारची माहिती मागू शकतो हे सांगितले. प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांनी अध्यक्षीय समारोपात माहिती अधिकार कायद्याचा सकारात्मक उपयोग केल्यास शासकीय कामांना गती मिळू शकते तसेच दुरुपयोग केल्यास विकास कामांना अडसर येऊ शकतो असे सांगितले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. एस. एस. साळुंखे यांनी तर आभार प्रा. डॉ. जे. पी. नेहेते यांनी मानले. कार्यक्रमाला एकूण १२० विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी नोंदणी केली.

यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ.जे.पी. नेहेते, प्रा.एस. एस.साळुंके, प्रा.डॉ.डी.बी.पाटील यांनी परिश्रम घेतले.

## 3. Youth Health Expedition during COVID-19:

Rapidly raise population level immunity and reduce the number of susceptible in order to achieve disease control or elimination goalsCOVID 19 prevention vaccination, camp was organized in college as per the guidelines of Mission Youth Health, Maharashtra Government. The camp was between 25/10/2021 to 02 /11/ 2021 with the help of Primary Health centre, Ainpur. The camp was inaugurated by Hon. Principal Dr. J. B. Anjane. Dr. Sandip Choure, Nurse Bharati Rane from PHC Ainpur and our staff made the efforts for successful of camp.

दैनिक **लोकशाही**

## ऐनपूर महाविद्यालयात कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण शिबिराचे आयोजन



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर, ता.रावेर** वार्ताहर

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मिशन युवा स्वास्थ या अभियाना अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व प्राथमिक आरोग्य केंद्र ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५ ऑक्टोबर २०२१ सोमवार रोजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी कोविड-१९ लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हे शिबिर दि. २५ ऑक्टोबर २०२१ ते २ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत दररोज महाविद्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. सदर शिबिरात आज १३ विद्यार्थ्यांना कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरणाचा डोस देण्यात आला. त्यासाठी प्रा.आ.केंद्र ऐनपूर येथील डॉ.संदीप चौरे, नर्स भारती राणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिर यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.जे.पी. नेहेते, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. डी.बी.पाटील, डॉ.एस.एन.वैष्णव, सुनील पाटील, गोपाळ पाटील, कुत्रु अवसरमल यांनी परिश्रम घेतले.

LOKSHAHI Main Edition
Oct 26, 2021 Page No. 1
Powered by : eReleGo.com

## 4. Voters Awareness Program

To involve the youth in the voting process and educate them about EPIC card, college has arranged the campaign for distribution of voter registration form on 02/05/2021. The campaign was inaugurated by the auspicious hands of Hon. Principal J. B. Anjane the program was anchored by Hemant Baviskar and vote of thanks by Dr. V. N. Ramteke. The campaign was introduced by Dr. J. P. Nehete. During inauguration function speech Dr. J. B. Anjane was delivered the speech on importance of voters in democracy. The success of this program IQAC coordinator Dr. S. N. Vaishanav was made the effort.

दैनिक **लोकशाही**

# पटेल महाविद्यालयात मतदार जनजागृतीला सुरूवात



**लोकशाही न्युज नेटवर्क**
**ऐनपूर, ता.रावेर** वार्ताहर

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियानाला सुरुवात झाली. या अभियानात १८ वर्ष वय पूर्ण झाले असेल अशा विद्यार्थ्यांना नवीन मतदार नोंदणी फॉर्म चे वाटप करण्यात आले.

या अभियानाचे उद्घाटन महाविद्यालयचे प्राचार्य मा.डॉ.जे.बी अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन भाषणात प्राचार्य यांनी लोकशाही व मतदार याचे महत्त्व सांगितले. तसेच महाविद्यालयात मतदार जनजागृती चे पोस्टर लावून प्रचार व प्रसार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.हेमंत बाविस्कर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.व्ही.एन.रामटेके यांनी केले. या कार्यक्रमांचे प्रास्ताविक एन.एस.एस.अधिकारी डॉ.जे.पी.नेहेते यांनी केले या अभियानाच्या यशस्वीतेसाठी आयक्युएसीचे समन्वयक डॉ.वैष्णव यांनी प्रयत्न केले.

LOKSHAHI Main Edition
Nov 2, 2021 Page No. 1
Powered by : eReleGo.com

## 5. Celebration of Constitution Day

जळगाव **तरुण भारत**

Main Edition | 2021-11-29 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

हात.

### ऐनपूर महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**रावेर :** तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भारतीय संविधान दिवसाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या आंतकवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील इतिहास विभागात कार्यरत असलेले प्रा. प्रदीप तायडे हे होते. प्रा. तायडे यांनी सुरुवातीला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले व नंतर त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्व पटवून सांगितले. प्रास्ताविक सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.डी बी.पाटील यांनी तर सूत्रसंचालन व आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.जे.पी.नेहेते यांनी मानले. सदर कार्यक्रमाला एकूण ९२ स्वयंसेवक, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.पी.नेहेते, प्रा. डॉ.डी.बी.पाटील, प्रा.डॉ.एस.एन.वैष्णव, नितीन महाजन, सचिन महाजन यांनी परिश्रम घेतले.

The constitution is the fundamental law of a nation that outlines the powers and limitations of the government, and the rights and duties of citizens. The constitution day is celebrated in our country on 26th November every year to commemorate the adoption of the constitution of the India. The program was started by worshiping the image of Hon. Dr. Babasaheb Ambedkar. Principal Dr. J. B. Anjane was the president of this program. Prof. Pradip Tayade delivered the speech on constitution. The program was anchored by Dr. D. B. Patil and vote of thanks by Dr. J. P. Nehete. 92 participants are actively participated.

## 6. Essay Competition on Matadan-EkRashtriyaKartarvya



जळगाव तरुण भारत

Main Edition | 2022-01-30 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

**मतदान जनजागृतीसाठी ऐनपूर महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार**

**रावेर :** तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयास रावेर येथे नुकतेच राष्ट्रीय मतदार दिवसी उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून प्रांताधिकारी कैलास कडलग यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील प्रा. डॉ. जयंत नेहेते यांना मतदान जनजागृतीसाठी उत्कष्ट कार्य केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी नेहा रायपुरे हिने निबंध स्पर्धेसाठी प्रथम, गजानन कोळी यास चित्रकला स्पर्धात प्रथम तसेच रांगोळी स्पर्धात अंकिता शिरनामे हीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. यासाठी नोडल अधिकारी हेमंत बाविस्कर यांनी परिश्रम घेतले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांचे मार्गदर्शन लाभले.

To encourage the youth for importance of voting and impart their knowledge, college organized the easy competition on voter awareness program. Dr. P. R. Mahajan and Mr.M.K. Sonawane were the examiners of these competitions. First number in Easy competition is Miss Neha Raypure, Gajanan Koli in Poster and Miss Ankita Shirname in Rangoli competition. First numbers were awarded by the auspicious hands Hon. Kailas Kadlag, District Magistrate Faizpur zone and Smt. Usharani Bahugune, Tahshildar Raver in Raver Tahshil Office. Second and third number certificate was distributed in college by auspicious hand of Hon Principal Dr. J.B. Anjane.

## 7. AIDS Awareness:

To be AWARE of how to protect themselves and prevent the transmission of HIV, AIDS awareness program was conducted in college. Dr. Sandip Chaudhari delivered the speech on AIDS, mental and physical heath. Principal Dr. J. B. Anjane was the president of this program. The program was anchored by Dr. V. N. Ramteke. 92 participants are present.

दैनिक

# महाराष्ट्र सारथी

शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

| वर्ष १ ले | अंक : २१९ | गुरुवार ०९ डिसेंबर २०२१ | संपुर्ण महाराष्ट्रातुन एकाच वेळी प्रकाशित | पाने ६ | किंमत ५ रु. |
|---|---|---|---|---|---|

## ऐनपुर येथील सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालयात एड्स जनजागृती सप्ताहाचे आयोजन

**महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**ऐनपुर । प्रतिनिधी :**
**(विजय एस अवसरमल)**



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात एड्स जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध पोस्टर्स तयार करुन जनजागृती केली. एड्स या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले. एड्स जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने डॉ संदीप चौधरी विटवा एड्स, शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.एड्स झालेल्या व्यक्तीस स्पर्श केल्याने अथवा त्याच्या वस्तु वापरल्याने होत नसतो. एड्स झालेल्या व्यक्तीस भावनिक दृष्ट्या खचू देऊ नका. लैंगिक संबंध ठेवताना काळजी घेणे आवश्यक आहे. आपल्या पार्टनरशी प्रामाणिक राहयला हवे.एका व्यक्तीला इंजेक्शन देत असताना तीच इंजेक्शनची नीडल दुसऱ्या व्यक्तीला देता कामा नये ही काळजी घेतली गेली पाहिजे. तसेच जर एखाद्या व्यक्तीला एड्स झाला असेल त्याचा द्वेष करू नका त्यांच्याशी मैत्री करा. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जे बी अंजने यांनी सुद्धा शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याची काळजी घेतली पाहिजे आणि एड्स झालेल्या व्यक्तीशी मैत्री केली पाहिजे असे अध्यक्षीय समारोप भाषणात सांगितले. मानसशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख व विद्यार्थी विकास अधिकारी प्रा विनोद रामटेके यांनी सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाला ९१ विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या या कार्यक्रमासाठी प्रा विनोद रामटेके प्रा डॉ एस एस साळुंखे प्रा नरेंद्र मुळे प्रा प्रदीप तायडे प्रा एस पी उमरीवाड प्रा एम के सोनवणे प्रा अक्षय महाजन प्रा पाटील यांनी परिश्रम घेतले. शेवटी कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ संदीप साळुंके यांनी मानले.

## 8. Voter Awareness Programme

Efforts have been made for voter awareness by putting up voter awareness posters on notice boards, walls in college campus as well as in society. Vote awareness poster was collected from Election department of Raver Talshil Office. Due to poster, students are aware that the youth who’s age is 18 are eligible for voter registration process. Also, students feel that they should participate in the voting process

दैनिक **महाराष्ट्र सारथी**

शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

वर्ष १ ले | अंक : २२६ | गुरुवार १६ डिसेंबर २०२१ | संपुर्ण महाराष्ट्रातुन एकाच वेळी प्रकाशित | पाने ६ | किंमत ५ रु.

## ऐनपूर महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान

**महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**ऐनपुर । प्रतिनिधी :**
**(विजय एस अवसरमल)**



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महा विद्यालयात मतदार जन जागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचे उद्घाटन महा विद्यालयचे प्राचार्य डॉ जे.बी. अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी मतदार व लोकशाही यांचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमात नवीन मतदारांना नांव नोंदणी फॉर्म चे वाटप करण्यात आले. तसेच महा विद्यालयातील विविध व्हॉट्स ॲपच्या ग्रुपच्या माध्यमातून नांव नोंदणीचा सर्वेक्षण करण्यात आले. तसेच मतदार जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयात जनजागृती पोस्टर लावण्यात आले.

मतदार जनजागृती अभियानांतर्गत निबंध स्पर्धा चे आयोजन करण्यात आले. या निबंध स्पर्धात २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. निबंध स्पर्धातनेहा रायपुरे हिने प्रथम क्रमांक, भुषण अंबादास माळी याने द्वीतीय तर उदय रायपुरे याने तृतीय क्रमांक पटकावला. निबंध स्पर्धेसाठी डॉ पी.आर. महाजन व प्रा. एम.के. सोनवणे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. या अभियानासाठी महाविद्यालयात मतदार जन जागृती समिती स्थापन करण्यात आली.या अभियाना साठी श्री हेमंत बाविस्कर तसेच महा विद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## 9. World AIDS Awareness Day

लोकशाही

## ऐनपूर महाविद्यालयात एड्स जनजागृती

**लोकशाही न्युज नेटवर्क**
**ऐनपूर, ता.रावेर** ✍ वार्ताहर

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात दि. १९/१२/२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे जागतिक एड्स दिवस या निमित्ताने एड्स विषयी जनजागृती करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने हे होते. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून विश्वास पाटील, ग्रामीण रुग्णालय, पाल हे होते. त्यांनी जागतिक एड्स दिवसाबद्दल माहिती सांगितली. एड्स कोणत्या कारणांमुळे होतो ते त्यांनी समजावून सांगितले. जे लोक एड्स ग्रस्त आहेत अशा लोकांना समाजाने प्रेमाची वागणूक दिली पाहिजे. तसेच सर्व रासेयो स्वयंसेवकांनी एड्स बद्दल जनजागृती केली पाहिजे असेही ते म्हणाले. विश्वास पाटील यांच्या मार्गदशनात महाविद्यालयामध्ये रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रासेयो स्वयंसेवकांना



एड्स जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम जसे रॅली, पोस्टर, निबंध स्पर्धा राबविण्यासाठी आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.पी.नेहेते यांनी तर आभार प्रा.डॉ.डी.बी.पाटील यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी सेवा योजना एककाचे एकूण ९२ स्वयंसेवक उपस्थित होते.

Main Edition
21 Dec, 2021 Page No. 5
Powered by : eReleGo.com

To be AWARE of how to protect themselves and prevent the transmission of HIV, also HIV is a disease that does not discriminate. Anyone can contract this disease, AIDS day was celebrated in the college. Dr. Vishwas Patil, Primary Health Centre, Pal was the chief guest, Principal Dr. J. B. Anjane was the president of this program. The program was anchored by Dr. J. P. Nehete and vote of thanks by Dr. D. B, Patil. On this day Red Rebion Club was established. 92 participants are present.

## 10. National Consumer Day

# ऐनपूर महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिवस

**लोकशाही न्युज नेटवर्क**
**ऐनपूर, ता.रावेर** वार्ताहर



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे राष्ट्रीय ग्राहक दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. बी.अंजने हे होते. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील प्रा.डॉ.डी.बी.पाटील उपस्थित होते. प्रा.डॉ.डी.बी.पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय ग्राहक दिवसा बद्दल सविस्तर माहिती दिली. २४ डिसेंबर १९८६ या दिवशी भारताच्या राष्ट्रपतींनी ग्राहक कायद्याला मंजुरी दिली. म्हणून २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. प्रत्येक भारतीयाला ग्राहक संरक्षण कायद्यानुसार सहा हक्क मिळालेले आहेत. त्यात सुरक्षेचा हक्क, म्हणणे मांडण्याचा हक्क, माहितीचा हक्क, निवड करण्याचा अधिकार, तक्रार व निवारण करून घेण्याचा हक्क व ग्राहक हक्कांच्या शिक्षणाचा अधिकार यांचा समावेश होतो असे त्यांनी सांगितले. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट या ई-कॉमर्स साईट वर ऑनलाईन शॉपिंगमध्ये फसवणूक झाल्यास आपण ग्राहक हक्क कायद्या अंतर्गत तक्रार करू शकतो असेही ते म्हणाले. ग्राहकांनी विकत घेतलेल्या वस्तू किंवा सेवांमध्ये काही त्रुटी असल्यास ग्राहकांनी तक्रार कुठे करावी, कशी करावी, त्याची पद्धत काय असते या बद्दल जागरूक राहायला पाहिजे. ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी हा कायदा अंमलात आलेला आहे तसेच कोणताही ग्राहक कोणत्याही प्रकारच्या अन्यायकारक व्यवहाराची तक्रार या कायद्या अंतर्गत करू शकतो असे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले. सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.जे.पी.नेहेते यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. एस. एन. वैष्णव, व्ही.एन.रामटेके, डॉ. पी. आर. गवळी, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाला एकूण ७२ रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

Consumer is aware of the information about products, goods, services, and consumers rights, national consumer day was celebrated on 24 December Principal Dr. J. B. Anjane delivered presided speech about Consumer awareness is important so that buyer can take the right decision and make the right choice. The program was anchored and vote of thanks by Dr. J. P. Nehete. Nearly 72 participants was actively participants.

## 11. Digital Literacy:

Digital literacy is an important life skill, maybe the most important since the world is quickly transitioning into an Artificial Intelligence (AI) world, digital literacy workshop was organized in college on 4 January 2022. The deputy Maneger Shri Aditya Anand from Bank of Maharashtra Raver branch was the chief guest of this workshop. He delivered the speech on digital skills allow you to find, use & create information online in a productive and useful manner. Hon. Principal Dr. J. B, Anjane was the inaugurator and president of this workshop. The workshop was anchored by Mr. Hemant Baviskar and vote of thanks by Dr. S. N. Vaishnav.

Sardar V.P. Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

दैनिक

शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

# महाराष्ट्र सारथी

वर्ष १ ले | अंक : २४६ | बुधवार, ०५ जानेवारी २०२२ | संपुर्ण महाराष्ट्रातुन एकाच वेळी प्रकाशित | पाने ६ | किंमत ५ रु.

## ऐनपूर महाविद्यालयात डिजिटल लिटरसी वर मार्गदर्शन

**महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**ऐनपुर । प्रतिनिधी :**
**(विजय एस अवसरमल)**



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात बँक ऑफ महाराष्ट्र शाखा रावेर चे उपव्यवस्थापक श्री आदित्य आनंद व लिपिक मयूर रायमळे यांनी डिजिटल लिटरसी वर मार्गदर्शन केले. इंटरनेट बँकिंग, युपिआय द्वारे पैसे ट्रान्स्फर करतांना, क्रेडिट, डेबिट कार्ड, द्वारे पैश्यांचा व्यवहार करताना घ्यावयाची काळजी बाबत मार्गदर्शन केले. फ्रॉड करणारे नवनवीन क्लुप्त्या लढवून, आमीष दाखवून ओटीपी मिळवण्याचा प्रयत्न करतात.बॅक कुठल्याही परिस्थितीत ओटीपी मागत नाही. कोवीड लसीकरण नोंदणी साठी , बंद पडलेल्या इन्शुरन्स पॉलिसी सुरू करण्यासाठी, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड बंद पडले आहे ते सुरू करण्यासाठी ओटीपीची मागणी केली जाते. अशा फ्रॉड लोकांपासून सावध राहायला हवे. आणि चुकून फसवणूक झाली तर लगेच बँकेशी तसेच पोलिस स्टेशन मधील सायबर सेलशी त्वरीत संपर्क साधावा. असे प्रतिपादन आदित्य आनंद यांनी केले. मयूर रायमळे यांनी होम लोन, गोल्ड लोन, पर्सनल लोन,व्हेईकल लोन , तसेच बँकेच्या इतर योजनांविषयी माहिती दिली. बचत ,चालू, पीडीएफ खाते यांच्या विषयी असलेले नियम,अटी याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी डिजिटल साक्षरता ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने जलद गतीने व्यवहार करताना सावधानता बाळगावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा हेमंत बाविस्कर यांनी केले तर आभार डॉ सतिश वैष्णव यांनी मानले.

## 12. National Voters Day

दिव्य मराठी

भुसावळ 26-01-2022



सरदार वल्लभभाई पटेल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे मतदार दिनानिमित्त शपथ घेताना विद्यार्थी.

### ऐनपूर येथे घेतली मतदानाची शपथ

प्रतिनिधी | ऐनपूर

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त ऑफलाईन व ऑनलाइन पद्धतीने कार्यक्रम झाला. राष्ट्रीय सेवा योजना व मतदार जनजागृती कक्षातर्फे राष्ट्रीय मतदार दिवस : लोकशाहीचा जागर व लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. व्ही. एच. पाटील यांनी उपस्थितांना मतदानाची शपथ दिली. प्रमुख वक्ते म्हणून धनाजी नाना महाविद्यालयाचे डॉ. राकेश तळेले उपस्थित होते. आपण मतदान का केले पाहिजे तसेच त्यांनी मतदानाचे महत्व पटवून सांगितले. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.जे.पी.नेहेते यांनी मतदार दिनाबद्दल सर्वांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी अध्यक्षीय भाषणात, ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झाले आहे, त्यांनी आपले नाव महाविद्यालयाच्या नोडल ऑफिसरकडे नोंदवावे. त्या नावांचा मतदार यादीत समावेश करता येईल, असेही ते म्हणाले.

**रांगोळी, निबंध अन् पोस्टर स्पर्धेचे आयोजन**

मतदार दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयात रांगोळी, निबंध तसेच पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नोडल ऑफिसर प्रा. एच. एम. बाविस्कर यांनी केले. आभार प्रदर्शन सचिन महाजन या विद्यार्थ्यांने केले. गोपाल पाटील, नितीन महाजन, गोपाल महाजन यांनी सहकार्य केले.

To encourage the voters to participate in the democracy, 25th January is celebrated as voter' day in college. On this day pledge is given to students and staff of the college. Voter pledge is given by Prof. V. H. Patil, Dr. Rakesh Talale, D.N. College Faizpur has the chief guest for this program. He explained the importance of voter and voting in democracy. Hon Principal Dr J. B. Anjane is president of this function. Presided speech is inviting the students to participate in voter registration process whose age is 18 years. NSS programm office Dr. J. P. Nehete also explained the importance of voter'scelebration. The programme was anchored Mr. Hemant Baviskar and vote of thanks by Dr. S. N. Vaishanv

Sardar Arts & Science College AINPUR 425507 Dist-Jalgaon

## 13. Awareness on Intellectual Property Rights for the aspiring Minds



INTELLECTUAL PROPERTY INDIA

NIPAM
NATIONAL IP AWARENESS MISSION

Government of India
Ministry of Commerce and Industry
Department for Promotion of Industry and Internal Trade
Office of the Controller General of Patents, Designs and Trade Marks

CERTIFICATE OF APPRECIATION

*Presented to*

SARDAR VALLABHBHAI PATEL ARTS & SCIENCE COLLEGE, AINPUR, TAL - RAVER, DIST - JALGAON

*In recognition of active participation in the **National Intellectual Property Awareness Mission (NIPAM)** launched by the Government of India on the occasion of the 75th anniversary of independence under the banner "Azadi Ka Amrit Mahotsav" to create widespread awareness on Intellectual Property Rights (IPR). The exceptional contribution in successfully organizing the awareness programme on **February 03, 2022** in association with **Intellectual Property Office, Mumbai** by providing your valuable time and support is highly appreciated.*

*Solicit your continued support for outreach of IPR far and wide.*

Date:February 05, 2022

(RAJENDRA RATNOO, IAS)
CONTROLLER GENERAL OF PATENTS, DESIGNS & TRADE MARKS






तरुण भारत

Main Edition | 2022-02-04 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com

# ऐनपूर महाविद्यालयात 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत 'बौद्धिक संपदा हक्क' विषयावर राष्ट्रीय वेबिनार

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, ३ फेब्रुवारी**

रावेर येथे आझादी का अमृत महोत्सव हा भारत सरकारच्या प्रगतीशील भारताच्या ७५ वर्षांचा आणि तेथील लोकांचा, संस्कृतीचा आणि कर्तृत्वाचा गौरवशाली इतिहास साजरे करण्यासाठी आणि त्यांचे स्मरण करण्यासाठी एक उपक्रमा अंतर्गत भारत सरकारच्या भारतीय पेटंट आणि ट्रेड मार्क कार्यालय मुंबई, भारत सरकार आणि ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथील ज्ञानस्रोत केंद्र (ग्रंथालय) यांच्या संयुक्त विद्यमानाने 'बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले.

प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजन सचिव डॉ. के. जी. कोल्हे यांनी केले त्यात त्यांनी बौद्धिक संपदा हक्क याची प्रासंगिकता तसेच त्याची व्याप्ती या विषयी माहिती देऊन हे वेबीनार सहभागी मान्यवरांना कश्या प्रकारे उपयोगी ठरणार आहे या विषयी सांगितले.

मुख्य वक्ते म्हणून भारतीय पेटंट आणि ट्रेड मार्क कार्यालय मुंबई, भारत सरकारचे अमोल रवींद्र पाटील हे होते. यांचा परिचय डॉ. एस. एन. वैष्णव यांनी करून दिला. आपल्या व्याखानात अमोल रवींद्र पाटील यांनी सर्वप्रथम सादरीकरणाच्या पहिल्या सत्रात बौद्धिक संपदे विषयी सर्वसाधारण माहितीचे विवेचन केले. तसेच बौद्धिक संपदाशी निगडीत विविध पैलूवर प्रकाश टाकला. यानंतर सादरीकरणाच्या दुसऱ्या सत्रात पेटंट विषयी मार्गदर्शन केले. यात त्यांनी पेटंट विषयी माहिती देऊन प्रत्यक्ष पेटंट नोंदणी पर्यंतची माहिती दिली. तसेच या संदर्भात असलेले विविध कायदेविषयक तरतुदी व संशोधकाला मिळणाऱ्या विविध संधी या बद्दल सखोल मार्गदर्शन केले. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या काळात तज्ज्ञांशी हितगुज झाली व त्यांच्या मनात असलेल्या शंका त्यांनी तज्ज्ञांसमोर मांडल्या यावर मार्गदर्शकांनी सखोल असे मार्गदर्शन केले. वेबीनारच्या समारोप प्रसंगी सहभागी प्राध्यापकांनी आपली मनोगते व्यक्त करताना सांगितले की वक्त्यांनी आपल्या सादरीकरणात दोन्ही सत्रात खूप छान माहिती दिली. त्याच बरोबर संजय खंडारे, निपण अधिकारी, आय. पी. आर. कार्यालय मुंबई, भारत सरकार यांनी सुद्धा कार्यक्रमात मार्दर्शन केले तसेच विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे दिली.

कार्यक्रमात शेवटच्या सत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी समारोपप्रसंगी भाषणात बौद्धिक संपदा हक्क या विषयाचे वेबीनार आयोजनाबद्दलचे महत्त्व सांगितले तसेच या संबंधी असलेल्या शिखर संस्था व त्यांचा बौद्धिक संपदा हक्क या बद्दल असलेल्या कार्या बद्दल विवेचन केले. तसेच बौध्दिक संपदा हक्क याविषयी विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक यांना जाणिव होण्याची गरज आहे.

या एक दिवसीय राष्ट्रीय सेमीनारला एकूण २७६ सहभागी यांची नोंद झाली. कार्यक्रमाचे प्रमुख प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने, कार्यक्रमाचे सचिव डॉ. के. जी. कोल्हे, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. एस. एस. साळुंके आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एस. एन. वैष्णव, तसेच सदस्य डॉ. एस. ए. पाटील प्रा. एच. एम. बाविस्कर, डॉ. जे. पी. नेहेते तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. एस. साळुंके यांनी तर तांत्रिक बाजू डॉ. जे. पी. नेहेते यांनी पार पाडली. यानंतर डॉ. जे. पी. नेहेते यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे तथा कार्यक्रमास लाभलेले तज्ञ मार्गदर्शक यांचे आभार मानले.

Strong IP rights help consumers make an educated choice about the safety, reliability, and effectiveness of their purchases, national intellectual property right workshop was organized in college on 03 February 2022. Mr. Amol Patil from Indian Patent and trade mark office, Mumbai, was the chief guest and invited talk for workshop. He delivered the speech on a patent is used to prevent an invention from being created, sold, or used by another party without permission. Patents are the most common type of intellectual property rights that come to people's minds when they think of intellectual property rights protection. Hon. Prin. Dr. J. B. Anjane was the president of this workshop. The introductory speech was delivered by workshop secretary Dr. K. G. Kolhe. The workshop was anchored by Dr. S. S. Salunke, the coordinator of this workshop. The vote of thanks by Dr. J. P. Nehete.

Nearly 276 participants are actively participated in this workshop with nice and knowledgeable question answer session.

## 14. Lecture on National Unity and Integrity



दैनिक महाराष्ट्र सारथी

शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

वर्ष १ ले | अंक : ३०२ | गुरुवार, ०३ मार्च २०२२ | संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रकाशित | पाने ६ | किंमत ५ रु.

**ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात 'राष्ट्रीय एकता व एकात्मता' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

**महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**ऐनपुर । प्रतिनिधी :**
**(विजय एस. अवसरमल)**

येथील सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय एकता व एकात्मता या विषयावर व्याख्यान चे आयोजन करण्यात आले होते. सविस्तर वृत्त असे कीकवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग, जळगाव व सरदार वल्लभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर, विद्यार्थी विकास विभाग, ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकता व एकात्मता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचे प्रमुख मार्गदर्शक मा. प्रा. मनीष जोशी (आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून आपला भारत देश हा महान आहे.एक भारत श्रेष्ठ भारत या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. या व्याख्यानाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने यांनी प्रत्येक भारतीय नागरिकाने भारतीय प्रतिज्ञेचे पालन केले पाहिजे.थोर देशभक्तांचा परीचय त्यांनी आपल्या भाषणातून करून दिला. विविध भाषा, विविध जाती- धर्म, विविध पेहराव, विविध चालीरीती, परंपरा, संस्कृती असून आपला भारत एक आहे. म्हणून श्रेष्ठ आहे असे त्यांच्या मार्गदर्शनामध्ये सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.विनोद रामटेके यांनी केले.

व कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय प्रा. एम. के. सोनवणे यांनी करून दिला. या कार्यक्रमा च्या आयोजनामध्ये सहाय्यक विकास अधिकारी प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे, सहाय्यक महिला विकास अधिकारी प्रा. डॉ. निता वाणी, सिनेटर सदस्य प्रा डॉ के जी कोल्हे व प्रा. डॉ. पी आर. गवळी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला १०३ विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांचे आभार डॉ नीता वाणी यांनी मानले.

Need of national unity and integrity, college was organized lecture series on national unity and integration. Dr. Manish Joshi, department of lifelong learning and extention, KBC North Maharashtra University, Jalgaon was the nicely interacted with the students on the topic  our country India is a great country, Ek Bharat Shrestha Bharat. Hon. Principal Dr. J. B. Anjane was the president of this program. The program was anchored by Dr. Vinod Ramteke. The guest was introduced by Mr. M. K. Sonawane and vote of thanks by Dr. Neeta Wani. Nearly 102 students and staff was actively participated.

Sardar V.P Arts & Sci. College
AINPUR
Pin
425507
Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon